महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र कारागृह विभाग
धुळे जिल्हा कारागृह,धुळे-४२४००१

दरपत्रक मागणी क्र.१

जा.क्रमांक धुजिका/प्लास्टिक भांडीखरेदी/दरपत्रक/ 1522 /२०१८-२०१९ दिनांक: ०९/०७/२०१८

धुळे जिल्हा कारागृहामार्फत बंद्यांच्या आहार वाटपासाठी प्लास्टीक थाळी व वाटी, ग्लास खरेदीसाठी स्थानिक बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	वस्तूचे नाव	विनिर्देश	परिमाण
१.	प्लास्टीक ताट	Shape- Round Material- Pure Plastic Length- 13 Inches Diameters. Non Breakable	२०० नग
२.	प्लास्टीक वाटी	Shape- Round Material- Pure Plastic Capacity- 300 ml. Non Breakable.	४०० नग
३.	प्लास्टीक ग्लास	Material- Pure Plastic Capacity- 200 ml. Non Breakable	२०० नग

दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण:- धुळे जिल्हा कारागृह,धुळे-४२४००१
दरपत्रक सादर करण्याचा दिनांक:-०९/०७/२०१८ सकाळी १०.०० वाजेपासून
दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक:-१५/०७/२०१८ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत
दरपत्रक उघडण्याचा दिनांक:- १६/०७/२०१८ सकाळी ११.०० वाजता.
(उक्त दिनांकामध्ये प्रशासकीय सोईनुसार बदल होवू शकतो.
दरपत्रकाची वैद्यता:- ०६ महिने

अटी व शर्ती:

१) प्लास्टीक थाळी, वाटी व ग्लासची गुणवत्ता व दर्जा विनिर्देशानुसार असावा. सदर वस्तू या नॉन ब्रेकेबल असाव्यात.

२) दरपत्रक सिलबंद पाकिटात धुळे जिल्हा कारागृह कार्यालयाच्या बाहेर असलेल्या दरपत्रक पेटीतच जमा करावे.

३) दरपत्रक सिलबंद पाकिटामध्ये **अधीक्षक,धुळे जिल्हा कारागृह वर्ग-१,धुळे-४२४००१** यांचे नावे देण्यात यावे. पाकीटावरती "प्लास्टीक थाळी, वाटी व ग्लास दरपत्रक " व आपल्या संस्थेचे नाव, पत्ता व

दूरध्वनी/मोबाईल क्रमांक स्पष्ट नमुद करण्यात यावा. सिलबंद नसलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.

४) आवश्यक नग संख्या कमी अथवा अधिक होवू शकते. त्याचे सर्व अधिकार या कार्यालयास राहतील.

५) दरपत्रकासोबत एकल निविदा देण्याबाबतची निविदाकाराचे हमीपत्र, पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडण्यात यावी.

६) दरपत्रक व हमीपत्र संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे. लेटर हेडवर (GST) क्र. नमुद असावेत.

७) दरपत्रकातील दर दि.१५/०१/२०१९ अखेरपर्यंत वैध राहतील. सदरचा पुरवठा हा सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाकरीता असेल.

८) कोणत्याही कारणाशिवाय एखादे दरपत्रक किंवा पूर्ण दरपत्रक प्रक्रिया रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

९) वस्तुचा पुरवठा खेरदी/पुरवठा आदेश पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत कारागृह गेटपर्यंत स्व:खर्चाने करावा लागेल. दिलेल्या मुदतीमध्येच वस्तू पुरवठा न केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता खरेदी पुरवठा आदेश रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

१०) पुरवठादारांकडून पुरवठा करण्यात आलेल्या वस्तूंचे आवश्यकता भासल्यास शासनमान्य प्रयोगशाळेकडून परिक्षण करण्यात येईल व त्याबाबतचे परीक्षण शुल्क पुरवठा दाराकडून वसुल करण्यात येईल.

११) पुरवठा केलेली वस्तू विर्निदेश, नमुना तसेच मानक गुणवत्तेप्रमाणे (Standard Quality) नसल्यास दोषयुक्त वस्तू स्व:खर्चाने परत घेवून जावे लागेल.

१२) दरपत्रकावर संस्थेचा GST/CST/VAT क्रमांक नमुद असणे आवश्यक राहील. तथापि GST/CST/VAT लागू नसल्यास संस्थेच्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे व सोबत पॅनकार्डची छायांकित प्रत तसेच बॉम्बे शॅप ॲक्टची प्रत जोडणे आवश्यक राहील.

१३) वस्तूंचा पुरवठा उधारीने करावा लागेल. अनुदान प्राप्त झाल्यानंतर बिलाची अदायगी करण्यात येईल.

१४) दरपत्रकासोबत सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये एकल निविदा/दरत्रक देण्याबाबत हमीपत्र व पॅनकार्ड इ. ची छायांकीत प्रत जोडणे अनिवार्य राहील. (सोबत हमीपत्राचा नमुना जोडलेला आहे.)

१५) दरपत्रक उघडण्याचे वेळी दरपत्रक सादर केलेल्या संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित राहु शकतील.

१६) वरील सर्व अटी व शर्तीची पुर्तता न केल्यास आपले दरपत्रक रद्द समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१७) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत सदर सुचना पत्रावर मोहर लावून स्वाक्षरी करण्यात यावी व सदर सुचना दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.

(वैभव आगे)
अधीक्षक
तथा अध्यक्ष खरेदी समिती
धुळे जिल्हा कारागृह,वर्ग-१,
धुळे.

Uphar Darpatrak